वर्ष २१

अंक १० वा

१५ एप्रिल १९४८


# समाज स्वास्थ्य




संपादक -

र. धों. कर्वे.

एम्. ए.


किंमत

४

आणे

# अनुक्रमणिका


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | कामवासनेवर बहिष्कार-७ ... ... ... | २१५ |
| २ | मुलाखत ... ... ... ... ... | २१९ |
| ३ | दीर्घायुष्य कशाने मिळतें ? ... ... ... | २२६ |
| ४ | आर्यसंस्कृतीचे मासले-३ ... ... ... | २२८ |
| ५ | पत्रव्यवहार ... ... ... ... | २२९ |
| ६ | शारदेचें पत्र ... ... ... ... | २३३ |



## अजंटांचीं नांवें

**मुंबई :** श्री. विठ्ठल बाबू बागवे, न्यूज एजंट, दादर.

**पुणें :** अल्. के. जोशी, बुकसेलर
डी.. अच्. शहा, बुकसेलर.

**कोल्हापूरः** स्कूल अॅन्ड कॉलेज बुकस्टॉल.

**बेळगांवः** जे. एम्. माणूरकर, खडे बाजार.

**अहमदनगरः** पी. जी. बापट, बुकसेलर, नवी पेठ.

**निपाणी :** के. एस्. बळगुर्गी

**ग्वाल्हेर :** डोके ब्रदर्स, लष्कर.

**कुमठा :** आर्. एम्. कामत

**नागपूर** सी. सी. ताठे, नवयुग न्यूज अेजन्सी.

**गोकाक :** पी. एम्. शिरगांवकर

**सावंतवाडी :** विनायक के. वाडकर.

अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# कामवासनेवर बहिष्कार—७

या बहिष्काराचा अेक परिणाम असा होतो की या विषयाचा शास्त्रीय दृष्टीने विचार करण्याची जरूरच पुष्कळांना दिसत नाहीशी होते. अेका लेखकाने लिहिलें आहे की ‘ अश्लील शब्दांनी किळसवाण्या कल्पना मनांत येतात. ’ येथे अश्लील म्हणजे ‘ कामेंद्रियासंबंधी ’ असाच अर्थ लेखकाच्या मनांत आहे. पण असें लिहिणारा लेखक स्वतः कामवासनेपासून अलिप्त नसतो आणि तो स्वतः संभोग करीत नाही असें नाही. त्यासंबंधी शब्द त्याला किळसवाणे वाटतात, पण प्रत्यक्ष कृति मात्र किळसवाणी वाटत नाही, हें कसें शक्य आहे ? की ती स्वतःची कृति मात्र किळसवाणी नसते, आणि दुसऱ्या कोणी ती केली किंवा तिचा उल्लेख केला, तर तो मात्र किळसवाणा होतो ? या सर्व विषयाकडे पाहण्याचा त्याचा चष्माच घाणेरडा आहे, असा याचा अर्थ होत नाही काय ?

या बहिष्कारामुळे या विषयाचा शास्त्रीय विचारच कित्येक शतकें-पर्यंत कोणी केला नाही. शास्त्रीय ज्ञानाला परंपरेचा जो नेहमी विरोध होत असतो, त्याचेच हें ठळक उदाहरण आहे. वैद्यकीय अभ्यासाकरतां प्रेतें कापावीं लागतात, त्यालाही असाच विरोध झाला आणि अजूनही प्रेतें फाडण्याला क्रिस्ती, मुसलमान, पारशी हे कडक विरोध करीत असतात. पण हे सर्व लोक वैद्यकीय विद्यालयांत हिंदूंचीं प्रेतें मात्र फाडायला तयार असतात ! परधर्मीयांचें कांही झालें तरी त्यांची हरकत नसते. डार्विनने माणसें

माकडांपासून झालीं आहेत असें ठरवलें, तेव्हां त्याच्याविरुद्ध काहूर उठलें, तसेंच डॉ. व्हॉरॉनॉफ्ने माकडांचे बीजकोश माणसांच्या अंगांत बसवण्याचे प्रयोग केले, तेव्हां त्यालाही भयंकर विरोध झाला. त्याचें खरें कारण म्हणजे खोट्या प्राचीन समजुती. पण सांगतांना मात्र नीति, आरोग्य, वगैरे अनेक कारणें पुढें येतात. शिक्षणांत अजूनही कामेंद्रियांचे आणि संभोगाचे बाबतींत मोकळी चर्चा व शिक्षण अशक्य होतात, मग यासंबंधी संशोधन आणि प्रयोग बाजूलाच राहिलीं.

फ्रॉइडच्या पुस्तकांना कित्येक देशांत बंदी आहे. युमाच्या मानसशास्त्रावरील पुस्तकांत असें म्हटलें आहे की 'फ्रॉइडने याचा विचार केला आहे, पण तो येथे देतां येत नाही.' शास्त्रीय पुस्तकांत इतका सोंवळेपणा काय म्हणून? अशा रीतीनें कित्येक शतकांपासून शास्त्रीय ज्ञान खची होत आलें आहे, आणि शास्त्रीय म्हणवणाऱ्या लेखकांना याची लाज वाटली पाहिजे.

यामुळे कामशास्त्राविषयीं इतकें अज्ञान पसरलेलें आहे की विवाहानंतर काय करावे हें कित्येकांना समजत नाही आणि अर्थातच अशा लोकांचें वैवाहिक आयुष्य सुखी होत नाही, त्यांत विनाकारण घोटाळे आणि गैरसमज निर्माण होतात. या मुद्यावर वात्स्यायनाने आपल्या कामसूत्रांत भर दिला आहे, आणि याची माहिती प्रत्येकाने जरूर मिळविली पाहिजे असें सांगितलें आहे. क्रिस्ती देशांत या अश्लीलतेच्या कल्पनांमुळे जननेंद्रिय स्वच्छ ठेवण्यास देखील बंदी असते आणि यामुळे मध्ययुगांत धार्मिक लोक नेहमी घाणेरडे असत आणि यालाच लोक नीतिमत्ता समजत असत. जेथे स्वच्छतेची विशेष काळजी घेणें जरूर असतें, अशा ठिकाणीं धार्मिक बंदी असल्यावर स्पर्श देखील करतां येत नाहीं, मग स्वच्छता राखणार कशी? जेथे अश्लीलतेची कल्पना बोकाळलेली असते, तेथे हा विषय निघाला की अविवाहित मुलींना बाहेर घालवतात आणि त्यांच्या देखत बोलावेंच लागलें तर कुजबुजतात, किंवा स्पष्ट बोलण्याऐवजी पडदा राखून बोलतात. पुण्यां-

तले अेक संस्कृतचे प्रोफेसर काव्य किंवा नाटक शिकवतांना कोठे अश्लीलतेचा वास येण्यासारखा असला तर त्या दिवशीं मुलींना यायला बंदी करीत असत. अर्थात् यामुळें जिज्ञासा अधिकच जागृत होऊन या सोंवळेपणाचा परिणाम बरोबर उलट होतो. मुलांनी पुस्तकें कोणतीं वाचावीं हें याच दृष्टीने ठरवण्यांत येतें, परंतु नशिबाने वीद्यापीठाच्या परीक्षांकरतां पुस्तकें नेमतांना हा निर्बंध पाळण्यांत येत नाही, यामुळे कालिदासासारख्या कवीवर बहिष्कार पडत नाही. असले विचार कृष्णराव मराठ्यांसारख्या निर्बुद्ध लोकांना शोभतात, ज्यांना कांही शास्त्रीय विचारांचा गंध आहे अशांना शोभत नाहीत.

परमा, गर्मी वगैरें रोगांचा या अश्लीलतावाल्यांना मोठाच उपयोग झालेला आहे आणि कामेंद्रियांवरच्या बहिष्काराला या रोगांचा मोठा आधार आहे. स्त्रीपुरुषसंभोगानेच मुख्यतः या रोगांचा प्रसार होतो, हें कारण संभोगाला भयंकर पाप ठरवण्याला सांगण्यांत येतें. अितकेंच काय, पण या पापाला शिक्षा म्हणूनच अीश्वरानें या रोगांची योजना केली आहे असें सांगण्यास धार्मिक लोक कमी करीत नाहींत. प्रस्तुत लेखकाला विल्सन कॉलेजांतून राजीनामा देण्याचा जो प्रसंग आला, त्याला अेक कारण म्हणजे या रोगांचा प्रतिबंध करतां येतो, आणि तो कसा करावा, यासंबंधींचा प्रचार हें होतें. या कॉलेजचे चालक मिशनरी असल्यामुळे प्रिन्सिपल मॅकेंझी यांनी लेखकाला बोलावून विचारलें, तेव्हां पुढील संवाद झाला. 'तुम्ही असला भयंकर प्रचार करतां असें मी अैकतों, तर ही गोष्ट खरी आहे का ?' 'ती खरी आहे.' 'पण असा रोगांचा प्रतिबंध केला तर पाहिजे त्याला पाहिजे तसें वागण्यास मोकळीक होअील आणि दुर्वर्तनाबद्दल अीश्वराने जी ही शिक्षा ठेवली आहे ती फुकट जाअील. तेव्हां हा प्रचार भयंकर आहे.' 'ही अीश्वराने ठेवलेली शिक्षा आहे असें धरून चाललें, तर मग या रोगांवर कांही उपायही करतां नये, कारण उपायांनी शिक्षा कमी होण्याचा संभव असतो. तेव्हां उपचार करणेंही पापच आहे, हें आपल्याला कबूल आहे

का ? ' यावर कांही उत्तर देणें शक्य नव्हतें, कारण आज सर्व जगभर उपचार करण्याची रीत आहे आणि ती वाअीट म्हणण्याअितके ते आडाणी नव्हते. पण रोगांचा प्रतिबंध करतां येतो असें कोणी म्हणाल्यास धार्मिक लोकांच्या अंगाचा तिळपापड होतो यांत शंका नाही आणि असा प्रचार करणारा मनुष्य भयंकर असला पाहिजे हें त्यांचें मत कायम आहे. अितकेंच नव्हे तर कांही धार्मिक लेखकांनी असें स्पष्ट लिहिलें आहे की हे रोग नाहींसे झाल्यास मोठाच अनर्थ होअील, कारण मग दुराचरणावर कांही निर्बंध राहणार नाही.

हें धार्मिक मत कायद्यांतही शिरलें आहे, कारण कायदे पुष्कळ वेळां धर्मावरच आधारलेले असतात. स्त्रीपुरुषांचा संबंध शक्य तितका दुर्लभ केला पाहिजे, त्याला होतां होअील तों सवलत देतां नये, असा पुष्कळ देशांत कायद्याचा कटाक्ष असतो. समागमाचा हक्क विवाहानेच उत्पन्न होतो, अेकमेकांशीं ज्यांचें लग्न लागलें नाही त्यांना परस्परसमागमाचा हक्क नाही, हें तत्व सर्वमान्य झालेलें आहे. अितकें की असा समागम म्हणजे गुन्हा समजावा, असा कायदा अजून झाला नाही याचें आश्चर्य वाटतें. अर्थात् व्यभिचाराविरुद्ध कायदे सर्वत्र आहेतच, पण ते वेगळ्या स्वरूपाचे आहेत. परस्त्रीशीं संबंध ठेवणारा मनुष्य दुसऱ्याचा माल त्याच्या परवानगीशिवाय वापरतो, म्हणून त्याला शिक्षा सांगितली आहे. नवऱ्याची परवानगी असेल तर व्यभिचार उघडपणें केला तरी चालतो, पण अर्थातच जे नवरे अशी परवानगी देतात, ते उघड परवानगी देत नाहीत, कारण त्यांत आपली बेअब्रू झाली असें त्यांनाही वाटतें. वास्तविक अब्रूचा संबंध अश्लील समजलेल्या अिंद्रियांशीं जोडणें मोठेंसें समंजस दिसत नाही, पण समंजसपणाचा आणि धार्मिक कल्पनांचा संबंध काय ? अशा कायद्यांत स्त्रीच्या अिच्छेचा संबंधच नसतो. कोणतीही अितर वस्तु जशी कोणी उसनी देवूं शकतो, पण परवानगीशिवाय ती घेतल्यास ती चोरी होते, तशीच पत्नीची गोष्ट आहे. तिने व्यभिचार केला हा गुन्हा होत नाही ( निदान हिंदुस्थानांत ), कारण

त्या गरीब विचाऱ्या वस्तूला काय कळणार? शिक्षा होते ती पुरुषाला, कारण अक्कल सगळी पुरुषांना असते आणि दुसऱ्याची वस्तु परवानगी-शिवाय वापरूं नये हें त्यांना कळलें पाहिजे. हे आमचे कायदे आणि हा आमचा धर्म! असल्या कल्पना जगांत आहेत तोंपर्यंत जग सुधारण्याची आशा लांब आहे.

---

# मुलाखत

## लेखक, स० हृदय, महाड.

पुण्याच्या साप्ताहिक 'सकाळ' मधें मधून मधून दीर्घायुषी गृहस्थांची मनोरंजक माहिती येत असते. मी त्या वृद्धांची सर्व हकीकत मोठ्या उत्सुकतेने वाचीत आलों आहें. कोणाचें काय, कोणाचें काय, अशीं निरनिराळीं तंत्रें आयुष्य वाढवण्यास कारणीभूत झाल्याचें दिसून आलें होतें. आपलें आयुष्य वाढावें म्हणून अितर लोकांना हमखास उपयोगीं पडलें असें नेमकें तंत्र कोणतें असावें, याचा उलगडा झाला नव्हता. त्या सर्वांच्या मुलाखती वाचून माझ्या मनाचा गोंधळ उडून गेला होता.

त्यांतच ता. ३ जूनच्या 'नवा काळ' मधें 'बहुरत्ना बसुंधरा' या सदराखाली दीर्घायुषी जीवनाचें रहस्य, खादाड शतायुषी, वगैरे परिच्छेदांतून दीर्घायुषी लोकांची बरीच माहिती आली होती. ती वाचून दीर्घायुषी व्हायला ब्रह्मचर्याचें पालन करायला पाहिजे ही माझी भोळी समजूत मात्र डळमळली. त्या लेखांत बहुतेक दीर्घायुषी लोक चांगले संसारी, अनेक बायका केलेले वृद्ध आढळत असल्याचें नमूद केलें होतें.

माझ्या माहितीचे भय्यासाहेब नांवाचे अेक गृहस्थ होते. त्यांच्या मुलाची नि माझी मैत्री असल्यामुळे ते मला ओळखीत होते. त्यांना नऊ मुलगे आणि चार मुली होत्या. त्या सर्वांचीं लग्नें होऊन भय्यासाहेबांचीं नातवंडें आतां लग्नाला झालीं होतीं. शिवाय भय्यासाहेबांची ९१ वी उल-

टून गेली होती तरी त्यांचा लालबुंद चेहरा पाहतांच ते आणखी पंधरावीस वर्षें जगांतील सुखोपभोग घेत राहतील असें वाटे. ते जीवनांतील मौज अनुभवणारांपैकी अेक गृहस्थ होते. अितर म्हाताऱ्यांपेक्षा ते जरा अैषआरामांत रहात आले होते. अितर लोक त्यांना रंगेल म्हतारा म्हणून संबोधून त्यांच्या चारित्र्याबद्दल चर्चा करीत असल्याचें मी अैकलें होतें. त्यांच्या मुलांनातवांच्या कानीं पण कांही गोष्टी गेल्या असल्या, तरी ते घरांतील वडीलधारे म्हणून त्यांच्याविषयी कोणी अनादर दाखवीत नसत, किंवा कोणी त्यांची उपेक्षाही करीत नसत.

त्या दिवशीं मीं विचार करून भय्यासाहेबांच्या दीर्घायुष्याचें अिंगित काय असावें हें जाणून घेऊन साधल्यास त्यांची मुलाखत ‘ सकाळ ’-मधें प्रकाशित करावी असें ठरवून सकाळीं त्यांच्याकडे गेलों. पाहतों तों ते फिरून येऊन, चांगला बंपरभर चहा टेबलावर घेऊन बसले होते. त्यांतले दोन घोट घेऊन त्यांनी अेक उंची सिगारेट नुकतीच सिलगावली होती. माझें त्यांनी हंसतमुखानें स्वागत केलें.

“ दूध वगैरे घेत नाही का तुम्ही सकाळीं ”? मी विचारलें.

“ नाही बुवा ! जेवतांना जें जाअील तेवढेंच घेतों. कांदे मात्र भरपूर खात असतों मी. ” हें काय विचारतां तुम्ही, अशा चेहऱ्यानें भय्यासाहेबांनी उत्तर दिलें.

“ किती वेळां भोजन घेतां तुम्ही ? ”

“ दोन वेळां, भरपूर, नि चहा दोन वेळां, भरपूर. ” मिस्किलपणानें ‘ दोन वेळां ’ वर जोर देत त्यांनी उत्तर दिलें.

त्याच वेळीं डेव्हनपोर्ट, लॉअिड जॉर्ज, वगैरे खादाड दीर्घायुषी लोकांची मला आठवण झाली. धूम्रपान, चहा, मद्य, वगैरेचें व्यसन सुद्धां दीर्घायुष्याला मारक ठरतें, ही माझी पूर्वापार दृढ झालेली समजूत भय्यासाहेबांकडे पहात असतांना खिळखिळी होऊं लागली.

" पौष्टिक औषधें, कधींकधीं रेचक, घ्यावें लागतें का ? "

" छट्, मुळीच नाही. थंडीच्या मोसमांत स्वादिष्ट बदामपाक गंमत म्हणून घेत असतों. सुवर्णमालिनीवसंत मात्र औषध म्हणून दीड महिना घेतों मी हिंवाळ्यांत, दिवाळीनंतर. छान तब्बेत राहते वर्षभर तें घेतल्यानें. "

" वातुळ पदार्थ किंवा अितर कोणते पदार्थ तुम्ही वर्ज्य करतां का भोजनांतून ? "

" कांही नाही. जें असेल तें पचवायचें. थालीपीठ, चिवडा मला फार अवडतात, नि मी ते पदार्थ भरपूर खातों हें तुम्हाला माहीत आहेच. "

मी आश्चर्यचकित झालों. आणखी थोडें खाण्यापिण्याबाबत बोलून मीं त्यांची दैनंदिनी विचारली.

" हें पहा, सकाळीं जाग येअील तेव्हां उठतों, नियम असा नाही. प्रातर्विधि झाले की मैल दीड मैल फिरायला जातों. येतांना भाजी आणतों. आल्यावर चहा घेतों आणि स्नान होअीपर्यंत वर्तमानपत्रें चाळतों. स्नान झाल्याबरोबर जेवून घेतों आणि लगेच वामकुक्षी करतों. दोन वाजल्यानंतर रीडर्स डायजेस्ट, अमेरिकन मर्क्युरी, लाअिफ, टाअिम, आपल्याकडचा फोरम, मॉडर्न रिव्ह्यू, न्यू लाअिफ, हरिजन, यांपैकीं जें वाचायचें राहिलें असेल तें वाचीत पडून राहतों. पांच वाजले की गांवांत अेखाद्या मित्राकडे खेप टाकून येतों. नंतर फिरायला जातों. सायंकाळीं नातवंडांशीं गप्पा मारतों. जेवलों की लगेच झोपून जातों. "

" नित्य असें कोणत्या ग्रंथाचें वाचन करतां आपण ? "

" कोणत्याच नाही. धार्मिक ग्रंथांचें तर नाहीच नाही. "

" आपल्या मनाच्या समाधानाची अशी अेखादी बाब कोणती ?

" अद्यावत् ज्ञान संपादन करून मन सारखें तेज राखायचें, त्या योगें मला समाधान वाटतें. "

" नियमितपणा असा कोणत्या बाबतींत बाळगतां ? "

" जेवण्याशिवाय कोणत्याच बाबतींत नाहीं. हां, पूर्वी सेक्रेटेरिअटमध्यें नोकरीवर असतांना मात्र कामावर जाण्याचा नियमितपणा बाळगावा लागत होता हें खरें. "

" आपलें नांव या जगांत रहावें असें वाटत नाही का तुम्हाला ? "

" त्यासाठीं हवीं तेवढीं नातवंडें आहेत की, आणि आतां पंतवंडें पण होऊं घातलीं आहेत ! " भय्यासाहेब हंसले.

" तरी पण व्यक्तिगत अशी महत्वाकांक्षा असतेच माणसाला. "

" आनंदांत, मजेंत जगायचें, हीच अेक माझी महत्वाकांक्षा आहे. आतां कीर्तीचें विचाराल, तर सर्वसाधारण माणसाचें नांव अेकदोन पिढ्यांपेक्षां जास्त पुढें जात नसतें. मी आपला साधारण बुद्धीचा माणूस आहें. भलती भगभग मी माझ्या मागें लावून घेत नाही. "

" सार्वजनिक कामें आपण जीं करतां, त्यांत आनंद वाटतो का ? "

" मी करीत नाही, लोक मला आपापल्या संस्थांत संस्थेचें महत्व दिसावें म्हणून ओढून घेतात. सभांना गेलों म्हणजे मला जें वाटतें तें मी बोलतों, सल्ला देतों म्हणाना ? याला तुम्ही समाजसेवा म्हणत असलां तर माझी ना नाही. "

" आपण तीन लग्नें केलीं ही गोष्ट खरी का ? "

" तीन नाही, चार लग्नें केली होतीं. आतां अेकही पत्नी हयात नाही. "

हें त्यांचें निर्विकार वृत्तीचें उत्तर ऐकून मी बुचकळ्यांत पडलों. अेकशें छत्तीस वर्षें जगणाऱ्या अेका म्हाताऱ्यानें आपल्या हयातींत अठ्याहत्तर बायका केल्याचें अलौकीक उदाहरण मला आठवलें. दुसऱ्या अेका बहादरानें आपलीं दीडशें वर्षें उलटल्यानंतर अकरावें लग्न केलें होतें. त्याचबरोबर बर्नार्ड शॉ तीनशें वर्षें जगूं अिच्छितो, महात्मा गांधी सवाशें वर्षें जगण्याची मनीषा बाळगतात, हेंही मला आठवलें.

" आपणाला किती वर्षे जगण्याची महत्वाकांक्षा आहे ? "

" मरेपर्यंत ! "

" तरी पण ? "

" मी काय सांगणार ? भविष्य मला कळत नाही, वारेमाप बोलणें मला आवडत नाही. "

" आपण मद्य सेवन केलें आहे कधीं ? "

" होय, समारंभांतून अनेक वेळां घेतलें आहे मी. संवय नाही. "

" धूम्रपान किती करतां ? "

" पांच पंचवीस सिगरेट्स लागतात दिवसांत मला. "

माझ्या दृष्टीनें भय्यासाहेबांना विचारायचें होतें तेवढें विचारून झालें होतें. पुण्याच्या साप्ताहिक ' सकाळ ' मधें द्यावयाची ती मुलाखत मनोमन तयार झाली होती, पण ' सकाळ ' मधें दीर्घायुष्याचें रहस्य कोणतें असें प्रत्येकाला विचारलेलें असतें, तेवढेंच राहिलें होतें.

" बरं पण भय्यासाहेब ! आपण दीर्घायुष्याचें रहस्य, गुरुकिल्ली कशांत आहे तें सांगाल का ? "

" न सांगायला काय आहे त्यांत ? पण तें तुम्हाला अितरांना पटणार नाही. "

" सांगा ना तरी पण ! "

" कोठल्याही तऱ्हेनें मनाची कुचंबणा न करतां आपल्या शारीरिक गरजा भागवणें हें माझ्या बाबतींत मला पटणारें रहस्य आहे. अितरांचें मी काय सांगूं ? "

मला वाटलें होतें की व्यायाम घेणें, मिताहार करणें, उषःपान करणें, प्राणायाम करणें, धौती घेणें, अशा प्रकारचें अेखादें गौप्य भय्यासाहेब मला सांगतील. मला त्यांचें तें उत्तर अैकून आश्चर्य वाटलें. तरीपण तें उत्तर तितकेंसें अर्थवाही नव्हतें असें मला दिसून आलें.

" शारीरिक गरजा म्हणजे काय ? "

"अन्नसेवन आणि कामपूर्ति," चटकन त्यांनी उत्तर दिलें. त्यांच्या भरलेल्या घरांत त्यांना अन्नाला तोटा नव्हता, पण त्यांची अेकही पत्नी हयात नसतांना... तें कसें शक्य होतें त्यांना ? मला मोठा विचार पडला. मी थोडा वेळ निमूट बसलों. काय विचारावें हा माझ्यापुढें मोठा प्रश्न पडला होता.

" कांहो, गप्प कां बसलां ? मला तुमची अडचण समजते. शिष्टाचाराच्या गैर कल्पनेखाली तुम्ही उगाच दडपले जातां आहां. मीच सांगतों तुम्हाला थोडक्यांत. निरोगी धडधाकट पुरुषाचा काम हा अखंड असतो. स्त्रियांचा पंचेचाळीस वयाच्या सुमारास मंद होऊं लागतो. अशा वेळीं पुरुषांना त्यांच्यापासून हवें तें समाधान मिळत नसतें. त्या दृष्टीने माझ्या बायका मला कांही काळ समाधान देऊं शकल्या. पण माणसाला नेहमीच तरुण बायका मिळत असतात असें नाही. त्या इतर कोठेंही मिळतात. माणसाला त्या बाबतींत घराबाहेर जी निवड करतां येते, ती घरच्या अर्धांगीबाबत करतां येत नाही. माझी शेवटची पत्नी दिवंगत झाल्यानंतर मी मला आवडेल ती क्षणाची पत्नी या गांवांत कोठेंही मिळवूं शकतों. फार काय ? माझ्या बायका असतांनासुद्धां मी माझ्या मनाची कुचंबणा कधीच केली नाही. "

भय्यासाहेबांचा हा स्पष्टवक्तेपणा माझ्या परिचयाचा नव्हता. माझा चेहरा अगदी गोरामोरा झाल्याचें समोरच्या आरशांत मला दिसत होतें. कांही वाटायचें तर त्यांना वाटायला हवें होतें, पण उलट मीच बेचैन झालों होतों. ही गोष्ट मुलाखतींत देतां येणार नाही याची कल्पना माझ्या मनांत डोकावूं लागली होती. माझ्या भित्र्या मनाला ' समाजांत याचा परिणाम भलताच होईल,' ही कल्पना चाटून गेली.

" हें पहा, तुम्ही माझी ही मुलाखत प्रकाशित करणार आहांत ना ? "

" होय, करणार आहें. "

" तरमग माझी सर्वच्या सर्व मुलाखत आली पाहिजे, समजलांत ?"

काय हें धार्ष्ट्य ? भय्यासाहेबांना गांवांत रंगेल म्हातारा म्हणतात, त्यांची थट्टा करतात, हें माहीत असूनही लोकांपुढें हें सारें मांडून आणखी टिंगल केली जावी असें वाटतें तरी कसें ? काय माणूस आहे हा ! कमाल आहे खरी !

माझ्याबरोबर भय्यासाहेबांनी पण एक कप चहा आणखी घेतला. थोड्याशा इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी झाल्यानंतर उठून जावेंसें मला वाटलें, तोंच एक विचित्र प्रश्न मला सुचला, नि मी तो कांहीही विचार न करतां त्यांना विचारला, " आपण या वयांत लग्न करूं इच्छितां ? "

" होय. चांगली अनुरूप, म्हणजे पंचविसतिशीच्या वयाची, सुरेख वधू मिळाली तर करीनही. पण या वयांत लग्न करणें पाप मानतात आपल्या समाजांत, म्हणून किंवा मला म्हातारा समजून कोणी स्त्री माझ्याशीं लग्नाला तयार होईलसें वाटत नाहीं. म्हणून मी माझा मार्ग शोधून काढून जगलों आहें. "

" बरं भय्यासाहेब ! आपला आभारी आहें मी, " असें म्हणत त्यांना नमस्कार करून बाहेर पडलों. ते मला पोर्चपर्यंत पोंचवण्यास आले.

" हें बघा, शेवटचें प्रश्नोत्तर मुलाखतींत घालण्यास चुकूं नका हं ! तेवढ्याच जाहिरातीने एखादी वधू सांगून येईलही कदाचित् मला ? " असें म्हणत भय्यासाहेब खूप मोठ्यानें हंसले, मीही हंसलों. खूप मोठ्याने आणि भरपूर हंसणें ही पण दीर्घायुष्याची एक मख्खी आहे हें मला त्यावेळीं जाणवलें.

( पुण्याच्या ' सकाळ ' मधें ही मुलाखत देणें शक्य वाटलें नाही, म्हणून मी ती **समाजस्वास्थ्याकडे** पाठवीत आहें. झाली तशी प्रसिद्ध करण्याला भय्यासाहेबांना मी नैतिक दृष्ट्या बांधला गेलों होतों. )

---

# दीर्घायुष्य कशाने मिळतें ?

'तुम्ही अितके कशामुळे जगलां ?' असा प्रश्न दीर्घायुषी माणसांना लोक नेहमी विचारतात आणि ते आपआपल्या कल्पनांप्रमाणें उत्तरें देतात, पण तीं बरोबरच असतात असा नियम नाही. अेक म्हणतो मी दररोज व्हिस्की घेतों म्हणून अितका जगलों, दुसरा म्हणतो मी कधी दारूला शिवत नाही म्हणून जगलों. तेव्हां खरीं कारणें शोधून काढण्यास या मतांचा उपयोग होणार नाही हें उघड आहे.

खरें कारणें काय असावीं, हें ठरवण्याकरतां पुष्कळशा दीर्घायुषी लोकांसंबंधी माहिती मिळवल्यास उपयोग होण्याचा संभव आहे, व या दृष्टीनें ष्टुटगार्ट येथील ग्रीफ् नांवाच्या अेका डाक्तराने जर्मनींत १९३० सालीं जिवंत असलेल्या १२४ शतायुषी माणसांसंबंधी माहिती मिळवली आणि यांपैकी पुष्कळांना स्वतः तपासलें. यांपैकी ८१ स्त्रिया व बाकीचे पुरुष होते. पुरुषांपेक्षा स्त्रिया जास्त जगतात हें माहीत होतेंच. या ८१ स्त्रियांपैकी ८० विवाहित होत्या आणि ४३ पुरुषांपैकीं ४१ विवाहित होते. यावरून विवाहित माणसें अविवाहितांपेक्षा जास्त जगतात हें सिद्धच होतें. या सर्वांना मुलेंही पुष्कळ होतीं, म्हणजे या स्त्रियांपैकी प्रत्येकीस सरासरी मानाने ५·८ मुलें होतीं.

या शतायुषी माणसांचीं बहुतेक भावंडेंही दीर्घायुषी होतीं असें आढळलें. अन्नाचे बाबतींत असें आढळलें की त्यांच्या सभोंवतालच्या अितर लोकांच्या आणि त्यांच्या अन्नांत फरक नव्हता. त्यांपैकी अेकही मनुष्य शाकाहारी नव्हतें. या सर्वांना चरबी जास्त असलेलें 'बेकन' (म्हणजे डुकराचें खारवून वाळवलेलें मांस) आवडत असे. म्हातारपणीं शरीरांतली चरबी कमी होते, ती भरून काढण्याचें काम या मांसाने होतें. यांना भाज्याही आवडत असत, पण गोड पदार्थ, पिठाचे पदार्थ, दूध व फळें

यांची आवध विशेष दिसली नाही. मसाले आणि लोणचीं यांची आवड दिसली. याचें कारण म्हणजे म्हातरपणीं पोटांत पाचक रस पुरेशा प्रमाणांत उत्पन्न होत नाही, तो होण्यास या पदार्थांनी चेतना मिळते. यांपैकी पुरुष भरपूर दारू पीत असत आणि स्त्रियांनाही म्हातारपणीं दारू जास्त आवडूं लागते असा अनुभव आहे.

यांपैकी अेकही स्त्री तंबाखू ओढीत नसे, पण ४३ पुरुषांपैकी न ओढणारा असा अेकच होता. ओढण्याचें प्रमाण कमजास्त होतें, पण अेक-सारखे विड्या ओढणारेही त्यांत पुष्कळ होते. यांत व्यायामाचे खेळ खेळलेले थोडेच होते, पण तालीम केलेले बरेच होते आणि चांगले पोहणारेही होते. यांपैकी बऱ्याच पुरुषांना तरुणपणीं व पुष्कळांना म्हतारपणींही पुष्कळ चालण्याची संवय होती. सरासरी पाहतां श्रवणशक्तीच्या मानाने या लोकांची दृष्टि अधिक शाबूत होती. यांची उंची आणि वजन एकंदर समाजांतल्या सरासरीपेक्षां कमीच होता. स्त्रियांचें वजन आठ 'स्टोन' (११२ पौंड) पेक्षा थोडें कमीच आणि पुरुषांचे १३३ पासून १५४ पौंडपर्यंत होतें.

हीं सर्व माणसें समाधानी वृत्तीचीं दिसली आणि बरींच माणसें उत्साही दिसलीं. या सर्वांना तरुण व मध्यम वयांत अनेक आपत्त्यांना तोंड द्यावें लागलें होतें, पण त्यामुळे तीं तावून सुलाखून निघालीं असेंच म्हणावें लागतें.

महत्वाचें वैयक्तिक मत म्हणून १९३५ सालीं वारलेल्या डॉ. गेनिया नामक फ्रेंच डाक्तराचें मत येथें देतों. याचें वय मरतांना १०३ होतें. 'शतायुषी होण्याकरतां,' अशा नांवाचें पुस्तक त्यांने वयाच्या ९९ व्या वर्षी लिहिलें आणि १०२ वर्षें पुरीं झाल्यावर त्याची तिसरी आवृत्ति त्यांनी पॅरिस येथील ( ॲकॅदेमी द मेद्‌सीन्' या वैद्यकीय संस्थेला नजर केली. असें दुसरें उदाहरण सांपडेल असें वाटत नाही. बुद्धि किती वयापर्यंत शाबूत राहूं शकते याचें हें उदाहरण आहे. या पुस्तकांत माणुसकीची

भूमिका, तीव्र बुद्धि आणि सूक्ष्म निरीक्षणशक्ति दिसून येते. अमुक अेक नियम पाळला म्हणजे मनुष्य शतायुषी होतें असें त्यानें म्हटलेलें नाही. आनुवंशिकतेने मिळालेल्या कणखर प्रकृतीलाच तोही महत्व देतो. तरीपण दीर्घायुष्याला पोषक म्हणून तो कांही नियम देतो. दररोज नियमाने श्वासोच्छ्वासाचा व्यायाम त्याच्या मतें अतिशय उपयुक्त असतो. मरण दूर ढकलण्याकरतां आणि शक्ति कायम राखण्याकरतां जारक ( ऑक्सिजन ) भरपूर असलेली मोकळी हवा, मधें कोणताही अड्थळा येऊं न देतां, फुफ्फुसांत घेणें जरूर असतें, हा त्याचा मुख्य उपदेश आहे. याशिवाय शरीरापासूनच मिळणारे अंतःस्राव व अितर पदार्थ यांचा औषधी उपयोगही त्याने सांगितला आहे.

---

# आर्यसंस्कृतीचे मासले–३

देव हे माणसांनीच निर्माण केले असल्यामुळे माणसांचे सर्व दोष देवांचे अंगींही सांपडल्यास नवल नाहीं. पुढील कथेचा अर्थ कळणें सोपें नाही, कारण आमचें ज्ञान त्याला पुरेसें नाही. "पूर्वी ब्रह्मदेव शंतनु महर्षींच्या आश्रमीं गेला, परंतु तो ऋषि बाहेर गेला असल्यामुळे त्याच्या पत्नीने ब्रह्मदेवाची पूजा केली. पुढें तिचें सुंदर रूप पाहून त्याचें वीर्य पतन होऊन तो लज्जेनें निघून गेला. कांही वेळाने शंतनु परत आल्यावर तें वीर्य पाहून, 'कोण आलें होतें?' म्हणून त्याने चौकशी केली व ब्रह्मदेवाचें अमोघ वीर्य फुकट जाऊं नये म्हणून त्याचा स्वीकार करण्याची तिला आज्ञा केली. त्या वीर्यापासून उत्पन्न झालेल्या गर्भाचें तेज तिला सहन होअीना, तेव्हां तिने तो गर्भ युगंधर पर्वतावरील दरींतील उदकांत टाकला. त्यापासून लोहित नामक तेजस्वी तीर्थाधिपति निर्माण झाला. पुढें क्षत्रियांचा वध केल्याबद्दल विष्णूला पाप लागलें, तें या तीर्थी स्नान करतांच नष्ट झालें. ( प्रा. चरित्रकोश )

यांतला कठिण प्रश्न असा की वीर्याचा स्वीकार करण्याची आज्ञा शंतनूने दिली, पण ती अंमलांत आणण्याची पद्धत कोणती तें सांगितलें नाहीं. हल्लीप्रमाणें कोणाही पुरुषाचें वीर्य घेऊन तें कोणाही स्त्रीच्या गर्भाशयांत पिचकारीने घालून कृत्रिम गर्भधारणा करण्याची रीत त्या काळींही माहीत असल असें म्हणावें, तरी पतन पावलेल्या वीर्याचा उपयोग कसा करणार? माणसांप्रमाणें चिष्णूलाही पाप लागतें आणि तें स्नानाने धुवून काढतां येतें हें ठीकच आहे. बहुतेक धर्मांत अशी सोय असतेच. अर्थात् याचा सत्यसृष्टीशीं संबंध नाही.

# पत्रव्यवहार

## १

आपले फेब्रुवारीचे अंकांत श्री. लिमये यांचा ' आमचे पुढाऱ्यांचे मेंदू सडले आहेत काय,' या सदराखाली लेख असून त्यास आपण दिलेलें उत्तर योग्य आहे. सदर लेखांत मशिदी, देवळें वगैरे धार्मिक स्थानें जमीनदोस्त करणेबद्दल लिहिलें आहे. तरी जमीनदोस्त करण्यापेक्षा हल्ली लोकांना पुरेशीं घरें नाहीत व मुंबईसारख्या ठिकाणीं पांचसात माणसें अेके खोलींत राहतात हें आरोग्यास घातक आहे, तरी वरील ठिकाणीं असलेले दगडाचे देव काढून तेथे माणसांची सोय केल्यास, तसेंच पुढाऱ्यांचे नांवाखाली फंड गोळा करून स्मारकें बांधण्याअैवजी योग्य घरें बांधलीं तर राष्ट्राचें आरोग्य वाढेल असें मला वाटतें. बाकी हें म्हणणें धार्मिक लोकांस पसंत पडेल असें नाही. तें आपल्यासारख्या स्वतंत्र विचार करणारांस पसंत पडेल म्हणून लिहिलें आहे.

आ. **दत्तात्रय शिवराम चिखले.**

उ. आपलें म्हणणें ठीक आहे. जगांतील उत्तम स्थळें धार्मिक अिमारतीनी व्यापलेलीं आहेत आणि त्यांचा उपयोग तिळमात्र नाही. पंढरपूरच्या विठोबाच्या देवालयाचें स्थान उत्तम आहे, पण त्याचा उपयोग काय होतो, तर यात्रेच्या वेळीं तेथे अतोनात गर्दी होऊन पटकीची सांथ हटकून

येते. या सर्व जागा लोकांच्या खरोखर उपयोगी पडल्या तर बरें, पण तें होणें दुरापास्त आहे. **सं.**

२

आपल्या मागें कार्य चालवण्यासंबंधी श्री. नाइक यांचा प्रश्न विचार करण्यासारखा वाटतो अक्कल असणाऱ्या लोकांची अेकूण संख्या बरीच कमी असल्याने 'रीझन,' 'समाजस्वास्थ्य' यांसारखीं मासिकें सतत चालण्याची व्यवस्था अिष्टच आहे. या दृष्टीने अेखादा गट तयार करणें शक्य आहे असें माझें मत आहे. श्री. मनोहर रा. लिमये हे शुद्ध विचार-सरणीची दिशा संवयीने शिकू शकतील असें दिसतें. मी स्वतः सरकारी नोकर आहें, परंतु वयाच्या ४५ वर्षी पेनशन घेण्याचा ठाम निश्चय आहे. त्यास सहा वर्षे लागतील, परंतु सराव होण्यास तेवढी मुदतही आहे. असेच कांही ( सुमारें दहा ) लोक झाले तर दरमहा रु. ५० पर्यंत तोटा सहन करूनही ध्येयवादी ज्ञानप्रसाराच्या दृष्टीने हें काम सतत चालू राहणें शक्य आहे. तसेंच शारदाबाओी हें टोपणनांव धारण करणाऱ्या बाओी ( असें मी गृहीतच धरतों ) सुद्धां फार मदत करूं शकतील. त्यांची अिच्छा सध्यां कोणाचा परिचय करून घेण्याची नाही हें ठीकच आहे, पण पुढें मागें अवश्य तर त्यांच्या सहाय्यासंबंधी विचारून ठेवणें अिष्ट आहे. शिष्यशाखा हा शब्द येथे उद्भवत नाही,कारण त्या शब्दाचा आजपर्यंतचा अितिहास वाओीट आहे. परंतु समाजस्वास्थ्याच्या संबद्ध विषयांचा अभ्यास करण्याचें साधन, मार्गदर्शन,वगैरे बाबतींत आपण सहाय्य करूं शकाल. तरी आपलें मत कळवून योजना मासिकांत जाहीर करावी व कोण कोण पुढें येतात तें पहावें. **'रवि'**

उ. मार्गदर्शन करण्यास मी केव्हांही तयार आहें. परंतु बुद्धिवादा-विषयीं आस्था बाळगणारे आणि ती पद्धत सर्व विषयांस लावण्यास तयार असणारे लोक फारच थोडे असतात. कोणत्याही प्रचाराकरतां अेखादी संस्था काढण्याचा प्रयत्न मी कधींही केला नाहीं याचें कित्येकांना आश्चर्य वाटतें,

परंतु संस्थांविषयीं माझा अनुभव बरा नाहीं. संततिनियमनाचा प्रचार मी अेकट्यानेंच १९२१ सालीं सुरू केला आणि केवळ प्रचारच करून थांबलों नाहीं, तर प्रत्यक्ष साधनें मागवून विकण्यास सुरवात केली, कारण केवळ बोलण्याचा व्यवहारांत उपयोग नाहीं आणि साधनें कोणीच पुरवीत नव्हते. मला याबद्दल कित्येकांनीं दोषही दिला, कारण प्रचारकानें फायदा काढण्याचा प्रयत्न करतां नये, त्याने प्रचाराचें महत्व कमी होते. वस्तुतः त्या काळीं त्यांतून फायदाही निघणें शक्य नव्हतें आणि जेव्हां ती शक्यता उत्पन्न झाली तेव्हां व्यापारीहि त्यांत पडूं लागले आणि त्यांच्याशीं टक्कर देणें मला केव्हांच शक्य झालें नाहीं. अशा प्रकारच्या मतभेदामुळें संस्था टिकणें कठिण होतें. येथें अेक संस्थाही निघाली आणि त्यांत मीही सामील होतों, पण मी आपलें काम बंद केलें नाहीं. संस्थेला मी स्वतःचें अिंग्रजी पुस्तक ( बऱ्याच प्रती ) नफा न घेतां दिलें. ती संस्था लवकरच लुप्त झाली, परंतु माझें काम चालूच राहिलें. पुण्यांतही अेक संस्था निघाली, तिचे चिटणीस श्री. कुळकर्णी हे अेकटेच प्रचाराचें काम सर्वत्र दौरा काढून करीत असतात. अितर सभासद तिकडे पहात नाहीत. येथली आणखी अेक संस्था म्हणजे ‘ रॅशनॅलिस्ट ॲसोसिअेशन ऑफ अिंडिया. ” तिने ‘रीझन’ नांवाचें बुद्धिवादी अिंग्रजी मासिक चालवलें होतें. त्याचे संपादक डॉ. डेव्हॉअिन यांचेवर क्रिस्ती लोकांच्या भावना दुखवणारा लेख छापल्याबद्दल फिर्याद झाली. तींतून ते सहीसलामत सुटले तरीही त्यांनी तें काम सोडलें व माझ्यावर पूर्वीच फिर्यादी झालेल्या असल्यामुळें तें पतकरण्याचा मला आग्रह झाला. मी तें पतकरलें ( अर्थात बिनपगारी ). संस्थेजवळ पैसेच नव्हते, ते पगार कोठून देणार ? पुढें स्वतःला समाजवादी म्हणवणाऱ्या अेका धनिकाने खर्च अंगावर घेतला, पण अशी अट घातली की संपादकाचें काम मीच करावें आणि मासिकांत समाजवादाकरतां कांहीं पानें ठेवावीं. अर्थात् माझें काम वाढलें, तेव्हां मी अशी अट घातली की कोणताही लेख मला पसंत असेल तरच येऊं शकेल व त्या धनिकाने मला थोडाबहुत पगार द्यावा. असें ठरून कांहीं

महिने लोटल्यावरही पगाराचें चिन्ह दिसेना, तेव्हां सदर धनिकाला मी अेक खरमरीत पत्र लिहिलें. तें त्याला अितकें झोंबलें कीं, 'कर्वे यांना संपादकाच्या जागेवरून काढल्यासच मी खर्च चालवीन' असें त्यानें संस्थेला कळवलें. आम्ही दोघेही व्यवस्थापक मंडळींत होतों, तेथे मी सांगितलें कीं संस्थेचें नुकसान होऊं नये म्हणून मी राजीनामा देतों. दुसरा संपादक नेमला, पण त्याला लेख कसे लिहितां येणार? त्याने मलाच विनंति केली की मी पूर्वीप्रमाणेंच लेख लिहावे (याला धनिकाची हरकत नव्हती) व छापखान्यांतले कच्चे खर्डेही तपासावे, नांव मात्र माझें नाहीं! तेंही मी कबूल केलें, पण संस्थेला शेवटीं ही धनिकाची अरेरावी असह्य होऊन त्यांनीं शेवटीं ठरविलें कीं खाजगी वर्गणी करून मासिक चालवावें व संपादक म्हणून माझेंच नांव घालावें. तथापि शेवटीं अितर काम पाहणारा कोणी न राहिल्यामुळें मासिक व संस्था बंद पडलीं व हल्ली ती कोणतेंही काम करीत नाहीं. मला स्वतःला अनेक विषयांची आवड असल्यामुळें मी ते वाचले. बुद्धिवादी लेखकांकडे माझा विशेष ओढा होता. मराठींत असे लेखक फारच कमी आणि अिंग्रजींतही फारसे नाहींत, निदान प्रत्येक विषयाला बुद्धिवाद लावणारे जवळजवळ नाहीतच. अमेरिकेंतील मरहूम डॉ. रॉबिनसन हे अशा प्रकारचे लेखक होते व त्यांचें माझ्यासारखेंच अेकट्यानें चालवलेलें अेक मासिक होतें. (तें पाहूनच मला स्फूर्ति मिळाली.) तें त्यांच्या मागें चालवण्याचा प्रयत्न झाला, परंतु यशस्वी झाला नाहीं. फ्रेंचमधें असे लेखक पुष्कळ आहेत. त्यांचा मला अतिशय फायदा झाला. त्यांच्या ग्रंथांची भाषांतरेंही अिंग्रजींत सांपडत नाहींत. तरीदेखील अेका फ्रेंच मासिकाची तशीच गत झाली हें मी पाहिलें. यामुळें माझ्या मागें मासिक चालेल अशी मोठीशी आशा वाटत नाहीं. चाललें तर उत्तमच. आगरकरांच्या मागें बुद्धिवादाचा हिरीरीनें प्रचार मी अेकटयानेंच केला आहे, असें मी नुकतेंच लिहिलें, तेव्हां ती कित्येकांना दर्पोक्ति वाटली, परंतु दुसरा कोणी मला तर दिसत नाहीं. श्री. लिमये यांची व माझी ओळख अलीकडेच

झाली व त्यांची विचारसरणी माझ्याशीं जुळती आहे हें खरें. त्यांना कदाचित् तें चालवतां येईल, परंतु केवळ विचारसरणीनें तें होत नाहीं, अनेक अडचणींना तोंड देण्याची तयारी असावी लागते. ती त्यांची नसेल असें मी म्हणत नाहीं, परंतु तें कठिण आहे अितकेंच. **सं.**

---

# शारदेचें पत्र

बोलायचें अेक आणि करायचें भलतेंच, ही राज्यकर्त्यांची पद्धतच असते आणि कॉंग्रेसवाले राज्यकर्ते त्यांत बिलकुल कसर करीत नाहीत. नेहरूंच्या धर्मातीत राज्यांत टपालाच्या प्रेषमुद्रांकरतां ( पोस्टाच्या तिकिटांकरतां ) जे नमुने पसंत केले आहेत, त्यांवर गांधींचें आणि बुद्धाचें चित्र आहे. बुद्ध हा विष्णूचा अवतार फार दिवसांपूर्वी मानला गेला आणि गांधींनाहीं बऱ्याच लोकांनी अीश्वराचा अवतार म्हटलें आहे. हे हिंदूंचे अवतार धर्मातीत राज्यांत कशाला ? यावरून हें हिंदुराज्य आहे हें सिद्ध होत नाहीं का ? तसेंच खेरांनी नुकतेंच सांगितलें की सर्व गव्हर्नरांचा प्रांतिक ध्वज भगव्या–नव्हे, नव्हे, ओकर–रंगाचा आहे. ‘ ओकर ’ हा भगव्याला अिंग्रजी शब्द आहे, तो वापरला तरी रंग लपत नाही. हा रंग कोठून आला ? हा भगवा रंग मराठ्यांना प्रिय असला तरी सर्व प्रांतांत तो काय म्हणून ?

आम्हाला जातीयतेचें विष नाहीसें करायचें आहे असें कॉंग्रेसचे पुढारी नेहमी ओरडतात, पण आज अितकीं वर्षें येथली नगरपालिका कांग्रेसच्याच ताब्यांत असतांना नव्या निवडणुकीच्या याद्या जातवारीने केलेल्या होत्या. तेव्हां स. का. पाटलांना काय झोप लागली होती ? आणि हल्ली ‘ कांग्रेसवाला ’ ही अेक नवीन जात निर्माण झाली आहे. गांधींच्या नांवानें अेक नवीन धर्म निघण्याचीं उघड चिन्हें दिसत आहेत.

बुद्धाला हिंदूनीं विष्णूचा अवतार बनवला, पण त्याच्या अनुयायांनीं त्याच्या नांवानें अेक निराळाच धर्म काढला. त्याचप्रमाणें गांधी हा त्याच्या नंतरचा अवतार अेवढेंच म्हणून लोक थांबले नाहीत, तर त्यांचीं देवळें बांधायला सुरवात झाली आहे. कोठेतरी अेक देऊळ ते जिवंत असतांनाच झालेलें आहे, आत्तां पुण्याच्या तुळशीबागेंत गांधींची अेक मूर्ति लवकरच बसणार आहे असें ऐकलें. खरी का ही बातमी? बाकी हिंदुस्थानांत दोनचारशें धर्मपंथ आहेत, त्यांत अेखाद्याची भर पडल्यानें कांहीं मोठासा फरक होणार नाही.

मौलाना आझाद म्हणतात, धर्मशिक्षण द्या. या धर्मशिक्षणांतूनच पाकिस्तान निघालेलें आहे. धार्मिक वृत्तीने भेद मात्र वाढतात आणि संघटना अशक्य होते, आणि तरी कांग्रेसवाले म्हणतात आम्हाला संघटना पाहिजे. संघटनेचा हा मार्ग नव्हे. अगोदर धर्मशिक्षण म्हणजे वेडगळ समजुतींचें शिक्षण. शिवाय अेका धर्माच्या लोकांत देखील धर्मशिक्षण म्हणजे काय शिकवायचें याबद्दल अेकमत होत नाही. अिंग्लंडांत सरकार-मान्य अेक क्रिस्ती धर्मपंथ आहे. अिंग्लंडांतले बहुसंख्य लोक जरी क्रिस्तीच असले, तरी त्यांतही अनेक पंथ असल्यामुळे क्रिस्ती धर्माचें शिक्षण द्यायचें म्हणजे काय शिकवायचें, यावर आज अनेक वर्षे भांडण चाललें आहे आणि अेकमत होणें अशक्य झालेलें आहे. तेव्हां धर्मशिक्षण द्यायचें म्हणजे प्रत्येक धर्माच्याच नव्हे, तर प्रत्येक पंथाच्या शाळा वेगळ्या ठेवाव्या लागतील. मौलाना आझाद शिक्षणमंत्री व्हायला लायक नाहीत हें यावरून दिसत नाही का? त्यांनीच परवां कोणालाही न समजणारें ऊर्दू बोलून स्वतःचा हेकेखोरपणा सिद्ध केला. कदाचित् अिंग्रजीच चालू रहावें या त्यांच्या म्हणण्याला दुजोरा आणण्याकरतांच त्यांनीं असें भाषण मुद्दाम केलें असेल, कोणाला ठाऊक?

लोकांना जबरदस्तीने नीति शिकवण्याच्या धोरणाला धरूनच परवां

वेश्यानियंत्रणाच्या कायद्याची चर्चा झाली. त्यांत वेश्यांवर अितकीं बंधनें घातलीं आहेत कीं वेश्यांना चोरून धंदा करण्याशिवाय गत्यंतर नाही. मुंबअीसारख्या ठिकाणीं त्यांनी मोठ्या रस्त्यापासून अमुक अंतराचे आंत राहतां नये असें म्हणण्यापेक्षा अमुक भागांतच त्यांनी रहावें असें कायद्यानें सांगितलें असतें तर बरें झालें असतें. पण तसें सांगितलें म्हणजे वेश्यांनी निदान जिवंत तरी रहावें असें कबूल केल्यासारखें होतें, तें मुरारजी देसाअी कसे कबूल करणार? त्यांना जागा देणाऱ्या घरवाल्यांना देखील शिक्षा सांगितली आहे. मग त्यांना अन्नधान्य किंवा अितर कोणतेही जिन्नस विकणारांना शिक्षा कां नको? अेका शहाण्यानें तर त्यांचीं घरें जाळावीं अशी सूचना केली. अशा अत्याचारांना विधिमंडळांत पाठिंबा मिळावा हें आश्चर्य आहे.

मुरारजी देसायांची अशी कल्पना दिसते की या कायद्यांनी आतां कोणी दारू पिणार नाही, वेश्यांचा तर नायनाटच होअील, अफू, गांजा, वगैरे सर्व प्रकारचीं व्यसनें हिंदुस्थानांतून नाहीशीं होतील, जुगाराला तर स्थानच राहणार नाही, आणि अेकंदरींत हिंदुस्थानांतले सगळे लोक अगदी मुरारजी देसाअी होतील. ही कल्पना अितकी वेडगळ आहे की ती अेखाद्या धर्मांतच शोभेल. वास्तविक असल्या सर्व कायद्यांचे परिणाम जे अमेरिकेंत झाले तेच येथे होतांना दिसतील. अमेरिकेंतल्या दारूबंदीचा परिणाम म्हणजे पाहिजे ते विषारी पदार्थ दारू म्हणून विकण्यांत आले. सर्वच चोरी असल्यामुळे त्यांविरुद्ध तक्रार करण्याची देखील सोय नाही. या दारूबंदीपासून अनेक बदमाषांनी आपला अतोनात फायदा करून घेतला आणि नंतर तो दारूबंदीचा कायदा रद्द झाल्याबरोबर या लोकांचा नफाही बंद झाला आणि या चटावलेल्या लोकांनीं अमेरिकेला गुंडगिरीचें माहेरघर बनवलें आणि तेथल्या पोलीसखात्यालाही ती आवरली नाही. याचीच येथ पुनरावृत्ति होणार हें ठरलेलेंच आहे. आतां तेथपर्यंत कॉंग्रेसचें राज्य चालू न राहतां या नीतिबाज लोकांच्या जागीं कोणीतरी समंजस माणसें येतील

अशी आशा करण्यापलीकडे कांही उपाय नाही. कांग्रेस आपलें थडगें स्वतः-च खणून ठेवीत आहे हें उघड आहे. तेंही अेका अर्थी बरेंच !

माटे कांही तरी विचार करतात अशी माझी कल्पना होती, पण त्यांनी नुकतीच जी आपली लाचारी बऱ्याच वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केली, तीमुळे मला मत बदलावें लागलें. कोणावरही प्रामाणिक टीका करण्याचा अधिकार कोणत्याही माणसाला आहे. विचार करून केलेल्या टीकेबद्दल मागून लोटांगणें घालण्याचें कांहींच कारण नसतें. मेलेल्या माणसावर टीका करूं नये असा शिष्टाचार आहे, पण जर ती टीका अगोदरच येऊन गेलेली असेल, तर तो कांही गुन्हा होत नाही, किंवा शिष्टाचाराचाही भंग होत नाही. मग माफी मागण्याचें कारण काय ? त्यांनी काय लिहिलें होतें हें मला माहीत नाही, पण त्यांनी असभ्य भाषा वापरली असली पाहिजे असा यावरून समज होतो.

माट्यांचा तर्कशास्त्राशीं कधी संबंध नसतोच आणि त्यांनी आहारासंबंधी नुकत्याच लिहिलेल्या लेखांत हें पुन्हा अेकदां सिद्ध झालें आहे. ज्या जातींतलें सोंवळे लोक हल्ली मांसाहार करीत नाहीत, त्यांतल्या विद्यार्थ्यांनी अितरांच्या नादीं लागून तो करूं लागूं नये, असें त्यांचें मत आहे. ब्राम्हणांचे वेदकालीन पूर्वज मांसाहार करीत होते, अगदी गोमांस खात होते, असा पुरावा संस्कृत ग्रंथांत सांपडतो, पण माट्यांनी अशी क्लृप्ति काढली आहे की वेदकालीन पूर्वज मांस खात होते हें खरें, पण मध्यंतरी त्यांनी ते वाअीट ठरवून तें सोडून दिलें, तर आपण तें पुन्हा सुरू करणें गैरच आहे. म्हणजे माट्यांच्या मतानें चालीरीतींत जो कांही फरक होअील तो चांगलाच असला पाहिजे, म्हणून मागची चाल पुन्हा अंमलांत आणूं नये. पण असा फरक करण्याचा अधिकार फक्त पूर्वजांनाच होता आणि आम्हाला नाहीं, असेंही त्यांचें मत दिसतें, कारण चालू असलेली शाकाहाराची रूढि सोडून मांसाहार करूं नये, असें तें म्हणतात. माटे आपल्याला सुधारक सनातनी म्हणवतात, पण हा शुद्ध आचरट

सनातनीपणा आहे. सारांश माथ्यांना जे पसंत असेल, तें ज्या काळांत आपले पूर्वज करीत होते, त्या काळची चाल चांगली, त्यांत फरक करूं नये. येथें तर्कशास्त्र काय रडेल माथ्यांच्या पुढें ?

हिंदुस्थानांत मुस्लिम लीगला कां थारा असावा हें मला तर कळत नाही, ज्या लीगने हिंदुस्थानांतला अेक तुकडा पाकिस्तान म्हणून तोडून काढला, तिचा हिंदुस्थानचे तुकडे करण्याचा उद्देश स्पष्ट दिसत असतांना मुस्लिम लीग कायम ठेवण्याचा ठराव मद्रासचे लीगवाले करतात आणि आमचें सरकार तें स्वस्थपणें अैकून घेतें. आणि हे हिंदुस्थानचें राज्य करणार ! मुसलमानांना जर हिंदुस्थानांत रहायचें असेल, तर त्यांनी लीगसारख्या संस्था काढतां कामा नये आणि अशा संस्था सरकारने बेकायदा ठरवल्या पाहिजेत. ज्यांना लीग पाहिजे असेल त्यांनी पाकिस्तानांत जावें म्हटलें तर त्यांत काय चूक आहे ? पण मुसलमानांच्या बाबतींत हें सरकार बावळटपणाच करणार असें दिसतें. हिंदुस्थानचे आणखी लचके तोडूं देण्याचा सरकारचा विचार आहे काय ? आतांपासून ते सावध न राहिले, तर शेवटीं, ‘ अपरिहार्य म्हणून तुकडे करावे लागले, ’ असें म्हणण्याची वेळ पुन्हा येअील हें नक्की.

गांधींच्या निधनानंतर त्यांचें उपोषणाचें वेड किती पसरणार आहे हें कांही कळत नाही. हिंदुस्थानांतल्या अडाणी लोकांना समंजसपणाने सांगितलेल्या गोष्टी कळत नाहींत, त्यांना उपोषणासारखे आततायी उपायच लागतात, हें तत्व गांधींच्या मागून समाजवाद्यांनी अंमलांत आणायचें ठरवलें आहे. साने गुरुजी स्वतःला समाजवादी म्हणवतात. त्यांनीं उपोषणांमागून उपोषणें चालवलीं आहेत. समाजवाद्यांची भूमिका धार्मिक नसते अशी माझी समजूत होती, पण आतां ती बदलावी लागणार. आतां अेस्. अेम्. जोशी देखील उपास करूं लागले. हा सांथीचा रोग आहे की काय ? आतां समाजवाद्यांचा एक राजकीय पक्ष आहे, आणि राजकारणांत प्रामाणिकपणा चालत नाही,

सोयीला येईल त्या शस्त्रास्त्रांचा वेळ पडेल तसा उपयोग करावा लागतो, तेव्हां धर्मावर आपला विश्वास नसला तरीही धार्मिक हत्यारांचा उपयोग करायला काय हरकत आहे, असें कांहींना वाटेल. पण सानेगुरुजींसारख्या साधुसंतांना लबाड तरी कसें म्हणावें ? कदाचित् असेंही असेल की राजकारण करायचें म्हणजे बहुजनसमाजावर वजन पाडावें लागतें, आणि गांधींना जर या शस्त्राचा असा उपयोग झाला, तर आपल्यालाच कां होणार नाही, असेंही या लोकांना वाटत असेल. हिंदुस्थानांत त्याचा उपयोग होईलही. निदान त्याने प्रासिद्धि तरी मिळते ! शांताराम नाही का प्रसिद्धीच्याच जोरावर जगद्वि-ख्यात दिग्दर्शक ठरले ? शांताराम पैशाच्या जोरावर पुढें आले, उपोषणाला खर्चाचीही जरूर नाही, तेव्हां गरिबांना हाच मार्ग चांगला. हो, सिनेमाच्या धंद्याला काय किंवा राजकारणाच्या काय, प्रसिद्धि पाहिजेच. मग ज्यांच्या-जवळ पैसे नसतील त्यांनी हा स्वस्त मार्ग धरला तर त्यांत वावगें काय आहे ?

तुझी **शारदा**

---

**नग्नसंघ**–लंडनपासून १७ मैलांवर अेके ठिकाणीं अेक नग्नसंघ निघाला आहे असें अैकून अेक धाडसी वार्ताहर तेथे जाऊन आला. तेथे त्याच्याशिवाय बाकीचीं सर्व माणसें नागवीं होतीं. युद्धपूर्व जर्मनींत असे संघ सर्वत्र निघाले होते आणि ते आतां इंग्लंडांत लोकप्रिय होत आहेत असें दिसते. हल्लीं ब्रिटनमध्यें सुमारें अडीच लक्ष लोक अशा संघांचे सभासद आहेत आणि ही संख्या भराभर वाढत आहे. हे संघ तेथील सूर्यस्नान-संस्थांना जोडलेले आहेत. सूर्यस्नान म्हणजे नग्न होऊन उन्हांत बसणें असाच अर्थ असल्यामुळें दोहोंत विशेष फरक नाहीं. ही माहिती देऊन येथील ' बॉंबे सेंटिनल ' मधील ' व्हेस्पर नोट्स् ' या सदराच्या लेखकाने अशी सूचना केली आहे कीं भरमसाट फायदा घेणाऱ्या कापडव्यापाऱ्यांची खोड मोडायला अशा संघांचा हिंदुस्थानांत चांगलाच उपयोग होईल.

# स मा ज स्वा स्थ्य

## वर्गणीची माहिती

हे मासिक दर १५ तारखेला प्रसिद्ध होतें. वार्षिक वर्गणी तीन रुपये, व्ही. पी. ने सवातीन. पोर्तुगीज प्रांतांत किंवा परदेशीं व्ही. पी. नाही. हिंदुस्थानाबाहेर साडेतीन रुपये किंवा पांच शिलिंग. मनीऑर्डर केल्यास चार आणे वांचतील. अंक न पोंचल्याची तक्रार महिना संपण्याचे आंत आम्हास मिळाली पाहिजे. पुणें येथील ग्राहकांनी ६९-१, लॉ कॉलेज रोड, येरंडवणें येथें वर्गणी भरल्यास चालेल.

**राअिट अेजन्सी, १३ नवी भटवाडी, मुंबई ४**

# आमचेकडे मिळणारा माल

**लॅम्बट डच कॅप**, आकार ५५ ते ७५, प्रत्येकीं रु ५
**उभट कॅप** ( देशी ) लहान, मध्यम किंवा मोठी, रु. १॥
**राअिट कॉंट्रॅसेप्टिव्ह जेली,** रु. ३॥
**पुरुषांकरतां पिशव्या,** ४ आणे, ८ आणे, १ रुपया
**कषायचूर्ण,** ( योनिमार्ग धुण्याकरतां ) बाटलीस अडीच रुपये
**कामोत्तेजक नंबर १,** (प्रकृतीकरतां) बाटलीस चार रुपये
**राअिट्यूब,** ( रोगप्रतिबंधाकरतां ) १४ आणे
**जेलोट्यूब** (फ्रेंच, रोगप्रतिबंधाकरतां), २ नळ्यांचे पेटीस दोन रुपये

**राअिट अेजन्सी, १३ नवी भटवाडी, मुंबई–४.**

Registered No. B 2289.

राइट एजन्सी, नं. १३, नवी भटवाडी, मुंबई, नं. ४.

## प्रो र. धों. कर्वे, एम्. ए. कृत पुस्तकें

१. आधुनिक आहारशास्त्र, किं. १॥ रु, ट. ख, ६ आणे.

२. आधुनिक कामशास्त्र [ सचित्र ], चौथी आवृत्ति किंमत रु. ४, ट. ख. ७ आणे.

३. संततिनियमन [सचित्र], ९ वी आ. १। रु. ट.ख. ५आ.

४. गुप्त रोगांपासून बचाव, ४थी आ.रु १, ट.ख.५आणे.

५. 'समाजस्वास्थ्य' मासिकांतील निवडक लेख,
भाग १ ला [ पहिलीं तीन वर्षें ], खलास आहे.
भाग २ रा [वर्षें ४-५-६], किं. २-०-०, ट.ख.६आ.

६. त्वचेची निगा, किं. ८ आ., ट. ख. ५ आ.

७. गुरुबाजी (नाटक) किं. ८ आ., ट. ख. ५ आणे

८. वेश्याव्यवसाय, किं. २ रु., ट. ख. ६ आ.

९. तेरा गोष्टी, किं. १ रु. ट. ख. ५ आ.

१०. न्यायाचा शोध ( नवीन सामाजिक नाटक ) किंमत १ रु., ट. ख. ५

११. पॅरिसच्या परी, किं. ३ रु., ट. ख. ६ आणे.

### डॉ. के. भा. लेलेकृत

१. बाहेरख्यालीचे दुष्परिणाम, २ री आ., किं. ५आ.

२. मूळव्याध. किं. ४ आ.

मुद्रण स्थळः—पॉप्युलर प्रेस, (मुंबई) लिमिटेड, ३५, ताडदेव रोड, मुंबई-७

मुद्रक व प्रकाशकः—रघुनाथ धोंडो कर्वे, राइट् एजन्सी,
नं. १३, भटवाडी क्रॉस लेन, गिरगांव, मुंबई-४